ISSN 2278-8808
An International Peer Reviewed
SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# आजन्म अध्ययन

लेखक

प्रा. संदिप भोंजीबा गोल्हार
सा.निर्मलाताई थोपटे षिक्षणषास्त्र महाविद्यालय, भोर, जि.पुणे.

प्रा. अनुराधा गंगाधर सांगळे
निर्मलाताई थोपटे षिक्षणषास्त्र महाविद्यालय, भोर, जि. पुणे.

## सारांश

निरंतर शिक्षण म्हणजे सातत्यपूर्ण शिक्षण होय. मानव जन्माला आल्यापासून शिकत असतो. दैनंदिन अनुभवातून व्यक्ती शिकत असतो. व्यक्ती जन्मापासून मृत्यूपर्यंत जे शिक्षण घेते ते निरंतर शिक्षण होय. निरंतर शिक्षण आयुष्यभर चालते. निरंतर शिक्षणामुळे व्यक्तीचा विकास होतो. निरंतर शिक्षणाचा प्रेरक स्वतः शिकणारा विद्यार्थी असतो. आज ज्ञानाचा प्रस्फोट मोठया प्रमाणावर झालेला दिसून येतो.लोकसंख्या वाढ व्यवसायिक शिक्षण ज्ञानाचा प्रस्फोट यामूळे आज निरंतर शिक्षणाची आवश्यकता आहे. निरंतर शिक्षणासाठी अनेक प्रकारचे कार्यक्रम राबवले जातात.

## आजन्म अध्ययन

निरंतरअध्ययन म्हणजे सातत्यपूर्ण शिक्षण मानव हा आयुष्यभर शिकत असतो. औपचारिक अनौपचारिक पद्धतीने मानव शिक्षण घेत असतो.मानव जन्माला आल्यापसून शिकत असतो. अन्न वस्त्र निवारा शिक्षण आरोग्य या मानवाच्या मुलभूत गरजा आहेत.या गरजांच्या पूर्ततेसाठी मानव आयुष्यभर प्रयत्न करतो. शिकण्यसाठी शाळेतच जावे लागते असे नाही. दैनंदिन अनूभवातून व्यक्ती शिकतो. म्हणजेच निरंतर शिक्षणाची प्रक्रिया सतत सर्वासाठी चालेली असते. या शिक्षणाची विशिष्ट सीमारेषा नसते. शिक्षणाच्या सर्व स्तरांव्यतिरिक्त जे शिक्षण मिळते त्याचा यात समावेश होतो.

मानवी जीवनाच्या सर्वांगीण प्रगतीत ज्ञानाचा वाटा फार मोठा आहे. याज्ञानाधिष्ठित समाजात ठिकून राहण्यसाठी जन्मभर शिक्षण घेण्याची सोय उपलब्ध करावयास हवी. जी व्यक्ती शिक्षणक्षम आहे. जिच्या शिक्षणात कधीही खंड पडला नाही त्या व्यक्तीने शिकत रहावे.

## व्याख्या

**व्यक्ती जन्मापासून मृत्यूपर्यंत जे शिक्षण घेतो ते आज्न्म अध्ययन होय.**

## वैशिष्टे

१. निरंतर शिक्षणास कोणतेही स्तर मान्य नाही.

२. आजन्म अध्ययन आयुष्यभर चालते.

३. घरजेनुसार बदल होतो.

४. निरंतर शिक्षणात व्यक्तीभेद राहतो.

५. वैयक्तिक विकस

## उद्दिष्टे

१. साक्षरता कौशल्य ठिकविणे

२. जीवनमान उंचावणे

३. विकास योजनेबाबत माहिती देणे.

४. राष्ट्रीय व सामाजिक मूल्य जाणीव

५. आर्थिक स्थिती व उत्पादनक्षमता सुधारण्यास प्रशिक्षण देणे

६. शिकणाऱ्या समाजाची निर्मिती

७. सांस्कृतिक व मनोरंजक उपक्रम

## गरज/आवश्यकता (कोणासाठी)

- १. ज्यांना सतत शिकायचे त्यांच्यासाठी
- प्रौढांसाठी
- नवीन माहिती कौशल्ये प्राप्तीसाठी

## आजीवनक्रनिरंतर अध्ययनाचे महत्त्व

१. निरंतर शिक्षण देण्याचे केंद्र समाजात असावे. लोकांनी लोकांसाठी चालविलेले केंद्र असावे.

२. हे केंद्र स्थानिक समुहाच्या गरजेप्रमाणे असावे.

३. तसेच १0 ते १५ निरंतर शिक्षण केंद्राच्या गटासाठी एक मध्यवर्ती केंद्र असावे.

४. प्रौढांना शिक्षण द्यावे.

५. यामध्ये ग्रंथालय़ वाचनालय़ पुरेशी जागा हवी.

## सुविधा

| | | |
|---|---|---|
| १. पुरेशी जागा | २. मानवी भौतिक सुविधा | ३. प्रकाश |
| ४. संगणक | ५. स्वच्छतागृह | ६. टि.व्ही. रेडिओ़ वर्तमानपत्र |

## केंद्र□उप□म

| | | |
|---|---|---|
| १. वाचन | २. चर्चा मंडळ | ३. सायंकालीन वर्ग |
| ४. प्रशिक्षण कार्य□म | ५. □िडा व साहस उप□म | ६. माहिती केंद्र |
| ७. संपर्क केंद्र | ८. सांस्कृतिक मनोरंजक कार्य □म | |

## आजन्म अध्ययनाचा प्रेरक

संपूर्ण समाजाचा विकास करण्याच्या दृष्टिने प्रेरक कार्यकुशल़ गुणी असावा.

स्वत□शिकणारा विद्यार्थी असतो. इतरांना शिकविणारा सर्वेक्षक असतो. कार्य□माची योजना करणारा संयोजक समन्वयक.

समस्यावर सल्ला देणारा मार्गदर्शक कार्य□मावर देखरेख करणारा पर्यवेक्षक नवसाक्षरांच्या अभ्यासाचे मूल्यमापन करणारा मूल्यमापन अहवाल □लेखक

**गरज**

१. **लोकसंख्येची वाढ**

दिवसेंदिवस जगाची लोकसंख्या झपाटयाने वाढत आहे. जुलै १९८७ ला जगाची लोकसंख्या पाच अब्ज होती. याच वेळी भारताची लोकसंख्या ७४ कोटी होती. यामुळे देशातील शिक्षण व्यवस्था अपुरी पडत आहे. उच्च शिक्षणातून वंचित झालेल्या समाजाला सामावून घेण्यास आजन्म शिक्षण हवे.

२. **ज्ञान व विज्ञानाचा प्रस्फोट**

आज ज्ञान व विज्ञानाचा प्रस्फोट झाला आहे. वाढतेज्ञान आजन्म शिक्षणाने मिळविता येते. कोणतेहीज्ञान कधी उपयोगी पडते म्हणून आजन्म शिक्षणाची गरज आहे.

The rapid explosion of knowledge has made the educationalists give stress on concept of life long process.

३. **तांत्रिक व विशेष कौशल्याची प्रगती**

विज्ञानाबरोबर तांत्रिक व कौशल्यातील ज्ञानाची वेगाने वाढ होत आहे. विज्ञानाच्या आधाराने यांत्रिक शक्तीचा अणुसंशोधनाचा उपयोग लहान मोठया क्षेत्रात केला जात आहे. तांत्रिक व विशेष कौशल्याची ओळख विजस करून देण्याचे काम आजन्म शिक्षणाचे आहे.

४. **विश्रंती काळाचा सदुपयोग**

मानवाचे जीवन दिवसेंदिवस धावपळीचे व नाविन्याचे बदलते होत आहे. अशा काळात व्यक्तीस मिळणरा फुरसदीचा वेळ कारणी लावणे उपयोगात आणणे व त्याद्वारे त्याच्या विकासास सहाय्यभूत ठरणे आजन्म शिक्षणानेच शक्य होणार आहे.

५. **नागरी व सामाजिक जबाबदारीची जाणीव**

आजन्म शिक्षणाने व्यक्तीस सुजाण नागरिक जाणीव करून देता येते. ही जाणीव सामाजिक जबाबदारी पार पाडण्याची क्षमता व्यक्तीच्या ठिकाणी निर्माण करते.

६. **भावनिक व आर्थिक समायोजन**

सद्यस्थितीमध्ये प्रत्येक क्षेत्रात नवनवीन कल्पना वेगाने पुढे येत आहेत. सामाजिक बदल वेगाने घडत आहेत. ग्रामीण व शहरी विभागात अनेक स्थित्यंतरे निर्माण होऊन खळबळजनक परिस्थिती निर्माण होत आहे. अशा वेळी भावनिक ऐक्य सामाजिक शांतता निर्माण करण्यासाठी आजन्म शिक्षणाची गरज भासते.

७. **व्यवसायिक शिक्षण**

व्यावसायिकज्ञान देणे गरजेचे आहे कारण प्रत्येक व्यक्ती उदर निर्वाहासाठी व्यवसायात व्यग्र असते. अशा लोकांना व्यवसायाचे ज्ञान देण्यासाठी आजन्म शिक्षण द्यावे.

## आजन्म अध्ययनाची साधने

The agencies of life long education are numerous formal education, non formal education, informal education.

घर, कुटुंब, समाज, शासन इ. आजन्म शिक्षणाची माध्यमे.


आजन्म शिक्षणाचे कार्य□म तीन प्रकारे तयार करतात.

१. औपचारिक  २. अनौपचारिक  ३. सहज

अशा रितीने वेगवेगळी माध्यमे आजन्म शिक्षणास हातभार लावू शकतात.

भारतात समूह संपर्क माध्यमांद्वारे आजन्म शिक्षणाचे कार्य□म राबविले जातात.

## आजन्म अध्ययनाचे कार्य□म




### १. प्रौढ शिक्षण

आपल्या देशात १५ ते ३५ वर्ष वयोगटातील स्त्री पुरूषांचा प्रौढामध्ये समावेश होतो. या वयोगटात मोठया प्रमाणातील लोकसंख्या निरक्षर आहे. अशा लोकांना शिक्षण देणे गरजेचे आहे.

या कार्य□मात शासन, विद्यापीठ, शाळा, सेवाभावी संस्था कार्यरत आहेत. खास संघटन करून केंद्र स्तरांवर एक वेगळा विभाग केलेला आहे.

**२. पत्राद्वारा शिक्षण**

जे लोक शाळेमध्ये शिक्षण घेऊ शकत नाही. काही कारणाने शिक्षणात खंड पडला अशा लोकांना पत्राद्वारे शिक्षण द्यावे.

**३. समाज शिक्षण**

समाजातील सर्व स्तरातील लोकांना प्रत्यक्ष समाजात जाऊन शिक्षण द्यावे.

**४. मुक्त शाळा**

भिंती नसलेली शाळा आपल्या देशात अशा प्रकारच्या शाळांची रचना फारच कमी आहे. शाळाबाहय असलेल्या सर्वांना शाळेत न जाता सर्व प्रकारचे शिक्षण घेण्याची व्यवस्था.

**५. मुक्त विद्यापीठ**

समाजातील उच्च शिक्षणापासून वंचित असा वर्ग अशा या वंचितासाठी बाहिस्थक्रपत्राद्वारा शिक्षण घेऊन पदवी मिळविण्याची सोय विद्यापीठात करता येते. अशा विद्यापीठात सर्व विषयांच्या पदव्या मिळविण्याची सोय करावी.

आपल्या देशात १९८५ मध्ये 'इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यालय' स्थापना झाली. यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ १९८९ पासून कार्यान्वित आहे.

**६. दूर शिक्षण**

समूह संपर्क साधनांचे कार्य यामध्ये महत्त्वाचे आहे. यात औपचारिक अनौ.शिक्षणाचा समावेश होतो. यामध्ये दूर राहून सर्व विषयाचे ज्ञान देता येते. यामधून एक मार्गी प्रक्रिया सुरू राहते.

**७. अनौपचारिक शिक्षण**

शिक्षण संस्थाच्या बाहेर सुव्यस्थित सुनियंत्रित केलेली पद्धती भारतात अशा शिक्षणाची गरज आहे. यामध्ये सभा संमेलन चर्चासत्र उद्बोधन वर्ग शिबीरांमार्फत अनौ.शिक्षण देतात.

## उद्देश

१. व्यक्तिमत्व विकास

२. विद्यार्थी तरूण प्रौढ यांना शिक्षण

३. अशा नव्या अपेक्षांची पूर्ती

४. अध्ययन परिस्थितीमध्ये एकात्मता आणणे.

The term lifelong education is often used interchangeably without of school education, follow emanation, further edn. Continuing education & community education.

It’s integral part of scheme of the education of an individual, a society, a state or nation.


**संकल्पना**

आजन्म शिक्षणाची प्रि□ग्रा सतत सर्व ठिकाणी सर्व काळात सर्वासाठी चालू असते. शिक्षणापासून कोणीही अलिप्त रहात नाही.

**महत्त्व**

| | | |
|---|---|---|
| १. व्यक्तीविकास | २. अपेक्षांची पूर्ती | ३. वेळेचा सदुपयोग |
| ४. कौशल्याचा विकास | ५. आत्मविश्वास | ६. कार्यमग्न |
| ७. नवीन आव्हाने सामोरे | ८. सर्वांगिण विकास | ९. स्वावलंबन |

**अध्यापक□भूमिकाक्रआव्हान**




**समारोप**

निरंतरअध्ययन हा आपल्या जीवनात एक महत्त्वपूर्ण घटक होय.

## संदर्भ


१. बन्सी बिहारी पंडीत लता मोरे (जून २००७) "उदयोन्मुख भारतीय समाजाचे शिक्षण" पिंपळापुरे पब्लिशर्स नागपूर.

२. के.के.जाधव ऑक्टो.२००८"नवीन काळाचे शिक्षण" मन प्रकाशन नाशिक.

३. दुनाखे अरविंद (२००७) "उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण" डायमंड प्रकाशन पुणे.

४. प्र.ल.नानकर संगिता शिरोडे (जाने. २००९) "वर्तमान शिक्षणातील विचारप्रवाह" नित्यनूतन प्रकाशन पुणे.

५. प्रतिभा पेंडके (जून २००६) "उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण" मंगेश प्रकाशन नागपूर.

६. प्रभाकर वीरकर प्रतिभा वीरकर (२००८) "उदयोन्मुख समाजातील शिक्षण" पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन पुणे ३०.

७. ह.ना. जगताप (जुलै २००७) "शिक्षणातील नवप्रवाह व नवप्रवर्तने" नित्यनूतन प्रकाशन पुणे.